नक्षलग्रस्त भागातील विविध विकास कामे करण्यासाठी शक्ती प्रदान समिती व मंत्रीमंडळ उपसमितीने मंजूर केलेला निधी खर्च करण्यास मंजूरी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांक : एनएएक्स ०९१५/प्र.क्र.२८९/विशा-१ब,
दुसरा मजला, मंत्रालय, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २४ ऑक्टोबर, २०१७

वाचा : (१) गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक एनएएक्स १११२/प्र.क्र.४४४/विशा-१ब, दिनांक २६.०८.२०१४
(२) गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक एनएएक्स ०९१५/प्र.क्र.२८९/विशा-१ब, दिनांक २०.०१.२०१७
(३)गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक एनएएक्स ०९१५/प्र.क्र.२८९/विशा-१ब, दिनांक २०.०१.२०१७

प्रस्तावना :-

नक्षलग्रस्त भागातील विविध विकास कामे करण्यासाठी शक्ती प्रदान समिती व मंत्रीमंडळ उपसमिती ही दिनांक २६.०८.२०१४ च्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आली आहे. शक्तीप्रदान समितीची दिनांक ११.८.२०१७ रोजी मा. मुख्य सचिव, यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत मंजूर करण्यात आलेल्या प्रस्तावांना मंत्रीमंडळ उपसमितीने मान्यता दिली. शक्ती प्रदान समिती व मंत्रीमंडळ उपसमिती समितीने नक्षलग्रस्त भागातील विविध कामे करण्यासाठी मंजूरी दिलेल्या प्रस्तावांस निधी उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

नक्षलग्रस्त भागातील विविध विकास कामे करण्यासाठी शक्ती प्रदान समिती व मंत्रीमंडळ उपसमितीने खालील नमूद सर्व उद्दीष्टांसाठी ३१,८९,२३,६००/- (रुपये एकतीस कोटी एकोनव्वद लाख तेवीस हजार सहाशे मात्र) खर्च करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

१. येलचील तालुका अहेरी व नेंडेर कॅम्प अलदंडी, तालुका एटापल्ली येथे सशस्त्र पोलीस दुरक्षेत्राचे कॅम्प उभारणी करुन प्रशासकिय इमारती शिवाय सशस्त्र पोलीस दुरक्षेत्रे तात्पुरत्या स्वरुपात कार्यन्वीत करण्यात आलेली आहेत. ती कायम स्वरुपी सुरु करण्यासाठी प्रत्येकी ३ कोटी असा एकत्रित ६ कोटी रुपये.
२. सुरजागड येथील खाणीच्या सुरक्षा व्यवस्थेसाठी येथे १ AOP सुरु करण्यात येणार असून तेथे नक्षलविरोधी अभियान राबविण्यासाठी जवेली - कुडंम - पिपंलीबुर्गी हा ११.५ किमी चा रस्ता तयार करण्यासाठी रक्कम रुपये १६.५० कोटी.
३. एक Unmaned Aeriel Vehicle (UAV) च्या खरेदीसाठी रक्कम रुपये ८ कोटी.
४. गडचिरोली जिल्हयासाठी ९ व गोदिंया जिल्हयासाठी अशा एकूण १२ TATA Zenon या प्रकारच्या वाहनांची प्रत्येकी खरेदी किंमत रुपये ६,६०,३००/- एवढी असून एकुण १२ वाहनांच्या खरेदीसाठी रक्कम रुपये ७९,२३,६००/- (रुपये एकोण ऐंशी लक्ष तेवीस हजार सहाशे मात्र)
५. प्रत्येकी किंमत रुपये ५ लक्ष असलेल्या Drone चे ६ नग खरेदीसाठी रक्कम रुपये ३०,००,०००/-
६. Mahindra and Mahindra कंपनीच्या Thar Jeep ची प्रत्येकी ६ लाख एवढी किंमत असलेल्या ५ Thar Jeeps खरेदीसाठी रक्कम रुपये ३०,००,०००/-

या निधीचे " नियंत्रक अधिकारी" पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे राहतील.त्यांनी खर्चावर कडक नियंत्रण ठेवावे. तसेच अपर पोलीस महासंचालक (विशेष कृती), हे शक्तीप्रदान समितीने उपलब्ध करुन दिलेल्या निधीचे आहरण व संवितरण अधिकारी असतील. खर्चाचा ताळमेळ ठेवण्याची जबाबदारी नियंत्रक अधिका-याची राहील.

संदर्भ क्रमांक २ अन्वये दिनांक २०.०१.२०१७ च्या शासन निर्णयान्वये शक्तीप्रदान समितीने उपलब्ध करुन दिलेल्या निधीसाठी अपर पोलीस महासंचालक (विशेष कृती), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या नावे स्वीय प्रपंजी लेखा खाते सुरु करण्यास महाराष्ट्र कोषागार नियम १९६८ च्या नियम ४९५ मध्ये नमूद नियमानुसार शासन मान्यता देण्यात आली आहे. सदरहू शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी व शर्तीचे पालन करण्यात यावे.

उद्दीष्ट	रुपये
५१- मोटार वाहने	९,०९,२३,६००
५२- यंत्र सामुग्री व साधनसामुग्री	३०,००,०००
५३- मोठी बांधकामे	२२,५०,००,०००
एकुण	३१,८९,२३,६००

सदरचा निधी मागणी क्रमांक बी-१०, ४०५५, पोलीसांवरील भांडवली खर्च, २०७-राज्य पोलीस - (००)(११)- शक्तीप्रदान समितीने शिफारस केलेली नक्षलग्रस्त भागातील विविध विकास कामे (कार्यक्रमावरील खर्च) (४०५५०२६१) या लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ मध्ये अर्थसंकल्पीत केलेल्या निधीतून खर्च करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

सदरहू निधी वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं २०१७ / प्र.क्र. ७५/अर्थ-३ दिनांक १८.४.२०१७ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या शक्ती नुसार खर्च करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७१०२४१५२४२४८८२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Vijay D Patil

Digitally signed by Vijay D Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5254aa09c72b0eb445f264826ab10bb42793fc26e3838113296e7ff812051f6f, cn=Vijay D Patil
Date: 2017.10.24 15:13:35 +05'30'

(विजय पाटील)
उप सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग
२) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग
३) अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग
४) प्रधान सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग

५) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६) अपर पोलीस महासंचालक (विशेष कृती), महाराष्ट्र राज्य, मुंबई,
७) महालेखापाल, महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१/२, मुंबई,नागपूर
८) महालेखापाल, महाराष्ट्र (लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई,नागपूर
९) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई,
१०) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
११) विशेष पोलीस महानिरिक्षक, नक्षलविरोधी अभियान नागपूर.
१२) पोलीस अधिक्षक, गडचिरोली, गोदिंया, चंद्रपूर.
१३) अवर सचिव, वित्त विभाग (व्यय ७) / कोषा प्र. ५, मंत्रालय, मुंबई,
१४) उप सचिव (पोल ७), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई,
१५) अवर सचिव (बीयुडी-१), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई,
१६) अपर मुख्य सचिव (गृह) / प्रधान सचिव (विशेष) यांचे स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई,
१७) निवड नस्ती/ विशा १ ब.